## न्या य नि र्ण य

(दिनांक ३०/०७/२०२६ रोजी घोषीत)

सहाय्यक सरकारी अभियोक्ता व आरोपीच्या वकीलांचा युक्तिवाद व पुराव्यावरुन खालील मुद्दे विवेचनार्थ उपस्थित झाले व त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह पुढीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

| अ.क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | दिनांक १३/०६/२०२५ मौजे चिकणी श्रीकृष्ण येथे आरोपी हा सार्वजनिक जागी १० लिटर गावठी हातभट्टी दारू व इतर वस्तू एकूण अंदाजे किंमत १,०००/- स्वतःच्या कब्जात विना परवानगी, अवैधरित्या गैरकायदा बाळगून मिळून आल्याचे अभियोग पक्ष शाबीत करतो काय ? | ... नाही. |
| २ | आदेश काय ? | ...आरोपीची निर्दोष मुक्तता. |

## का र ण मि मां सा

२. आरोपीविरुध्द दोषारोप शाबीत करण्यासाठी अभियोग पक्षातर्फे एका साक्षीदाराला तपासण्यात आले. अभियोग पक्षातर्फे श्रीकांत आदेश प्रघाने(अ.सा.क्र.०१) यांना पंच साक्षीदार म्हणून तपासण्यात आले. त्यांनी अभियोग पक्षाला पुरक साक्ष दिली नाही. भारतीय पुरावा कायदा कलम १५४ प्रमाणे उलटतपासातील प्रश्न विचारुन देखील अभियोगपक्ष या साक्षीदारांकडुन आरोपीविरुध्द काहीही आणु शकला नाही. न्यायालयामार्फत स्वतःहुन इतर साक्षीदारांना समन्स पाठविण्यात आले. परंतू इतर साक्षीदार गैरहजर राहील्याने तसेच जलदगतीने न्याय मिळणे हा आरोपीचा संविधानीक अधिकार असल्याने अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. उभय पक्षांचा युक्तिवाद ऐकला.

**वादप्रश्न क्र.१ करिताः-**

३. अभियोग पक्षातर्फे फिर्यादी, दुसरा पंच, तपास अधिकारी, नमुना वाहक यांना तपासले नाही. नमुना तपासणीकामी पाठविण्यात आल्याचे पत्र शाबीत झालेले नाही. त्यामुळे रासायनिक परिक्षण अहवाल प्रस्तुत आरोपीकडून जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भातीलच आहे, असा निष्कर्ष वाजवी संशयापलिकडे जाउन काढता येत नाही. त्यामुळे आरोपीचा गुन्हयातील सहभाग दिसून येत नाही. आरोपीविरुध्द कोणताही भक्कम पुरावा अभियोगपक्ष अभिलेखावर आणू शकले नाही. आरोपीने गुन्हा केल्याचे संशयापलिकडे जावुन सिध्द होत नाही. त्यामुळे वादप्रश्न क्र. १ चे उत्तर मी नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>वादप्रश्न क्र.२ करिताः</u>–**

४. अभियोगपक्ष आरोपीविरुध्दचा दोषारोप संशयापलीकडे जाउन सिध्द करु शकला नाही. त्यामुळे आरोपी निश्चितपणे निर्दोष सुटका होण्यास पात्र होत आहे. म्हणुन वादप्रश्न क्र.२ चा निष्कर्ष नोंदवितांना मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे–

**<u>आ दे श</u>**

| | |
|---|---|
| **१** | आरोपी देवदास कोचाजी मेश्राम यास महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५ ई नुसार शिक्षेस पात्र असणाऱ्या गुन्हयातुन फौ.प्र.सं. कलम २५५ (१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. |
| **२** | आरोपीचा जामीन कदबा रद्द करण्यात येत असून आरोपीला वर नमुद गुन्हयातुन मुक्त करण्यात येत आहे |
| **३** | आरोपीने फौजदारी पक्रिया संहिता कलम ४३७–अ प्रमाणे द्यावयाचा रक्कम रुपये १५,०००/–चा जामीन कदबा आज पासून पुढील ६ महिन्यांकरीता अस्तित्वात राहील. |

(**न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित**)

स्वा/–

दिनांकः ३०/०७/२०२६ (**रोशनी दिपक चौबे**)

प्र. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, आर्णी.
न्यायालय क्र.२